महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, लेबर कॅम्प, धारावी रोड, माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.
दुरध्वनी क्रमांक ०२२-२४०२९०२२ ईमेल :- dyeohr२@mahagenco.in

---

# महानिर्मिती सरळसेवा जाहिरात क्र.०४(May)/२०१६
## वाहन चालक पदाची सरळसेवा भरती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीतील वाहन चालक या पदांकरिता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन (Online) पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सूचना महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या **http://www.mahagenco.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

१) महानिर्मिती कंपनीच्या महाराष्ट्रातील सर्व औष्णिक विद्युत केंद्रातील अनुशेष तसेच सामाजिक व समांतर आरक्षण त्याचप्रमाणे रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन १८ पदे भरावयाची आहेत.

**वाहन चालक यांच्या रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे.**

| अ.जा. | अ.ज. | वि.जा-अ | भज-क | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | ०२ | ०१ | ०१ | ०३ | ०९<br>(माजी सैनिक-१) | १८<br>(माजी सैनिक-१) |

२) उपरोक्त पदासाठी विहित केलेली वेतनश्रेणी / शैक्षणिक अर्हता / अनुभव / वयोमर्यादा इत्यादीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) **वेतनश्रेणी :** रु.११,६२५-३७०-१३,४७५-४१०-१७,५७५-४५०-३१,९७५

२) **i) शैक्षणिक अर्हता :** उमेदवार किमान इयत्ता चौथीची (IV Standard) परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
उमेदवाराजवळ कोणत्याही गंभीर स्वरुपाच्या प्रतिकूल शेऱ्याशिवाय लहान आणि अवजड वाहन चालविणेचा परवाना असणे आवश्यक आहे.
उमेदवाराजवळील लहान आणि अवजड वाहन चालविणेचा परवाना हा महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयातून काढलेला असणे आवश्यक आहे.
उमेदवाराजवळ वाहन देखभालीच्या प्राथमिक तत्वे माहिती मधिल प्राविण्य असावे.

**ii) अनुभव :** उमेदवाराजवळ महाराष्ट्र राज्यातील किमान ४ वर्षे लहान व अवजड वाहन चालविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**iii) उंचीची मर्यादा:** उमेदवाराची उंची १५८ सें.मी.पेक्षा कमी नसावी तसेच १७५ सें.मी.पेक्षा अधिक नसावी.

३) **वयोमर्यादा :** दिनांक १६.०६.२०१६ रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४० वर्षापेक्षा जास्त नसावे.

**टीप :**
१) मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम राहील.
२) माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ही ४५ वर्षाची राहील.
३) महानिर्मिती कंपनीतील पात्र कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादेची अट लागू राहणार नाही.

**वाहनचालक या पदाकरीता ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. १६.०६.२०१६ अशी आहे.**

**<u>सर्वसाधारण अटी :-</u>**

१) जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेली प्रवर्गनिहाय पदसंख्या कमी, जास्त अथवा रद्द होण्याची शक्यता आहे. आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे. पदसंख्येत /आरक्षणात बदल झाल्यास त्याबाबतचा वेगळा खुलासा जाहिरातीद्धारे वा अन्य मार्गाने करण्यात येणार नाही.

२) जाहिरातीतील नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांनीच ऑनलाईन प्रणालीद्धारे अर्ज सादर करावा. संबंधित पदासाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे व शैक्षणिक अर्हता यांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच तसेच शैक्षणिक पात्रता, अनुभव व इतर आवश्यक अटी व शर्ती पुर्ततेच्या अधीन १:५ या प्रमाणात पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक /समांतर आरक्षण निहाय वाहन चालन परीक्षा घेण्यात येईल.

३) वाहन चालन परीक्षेनंतर लेखी परीक्षेत व वाहन चालन परीक्षेत उमेदवारांना प्राप्त गुणांचे एकत्रिकरण करुन अंतिम निवड यादी तयार केली जाईल.

४) उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी वाहन चालक या पदाकरीता ऑनलाईन प्रणालीद्धारे सादर केलेले अर्जच ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही मार्गाने केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

५) शासकीय/निमशासकीय/तसेच इतर वीज कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विभागामार्फत / योग्य अधिकारी वर्गामार्फत दिलेल्या सुचनेनुसार अर्ज सादर करावा. **अशा उमेदवारांची निवड झाल्यास त्यांच्या पूर्वीच्या कंपनीच्या/संस्थेच्या सेवेची कोणतीही जबाबदारी घेण्यात येणार नाही.**

६) महाराष्ट्र सिव्हील (Declaration of Small Family) अधिनियम, २००५ अंतर्गत विहित केलेल्या छोटे कुटुंब व्याख्यांमध्ये मोडणे ही एक आवश्यक पात्रता आहे.

**<u>मागासवर्गाचे आरक्षणासंबंधी अटी / नियम:-</u>**

१) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्ग यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.०८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९/०१/२००४ पासून अंमलात आणला आहे.
उपरोक्त शासन निर्णयान्वये आरक्षणासंबंधीच्या तरतुदी लागू होतील.

तसेच वरील अधिनियमानुसार फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना सोडून उर्वरित मागासवर्गातील सर्व जाती प्रवर्गातील म्हणजे वि.जा.(अ), भ.ज.(क), इतर मागासवर्ग यांना उन्नत/प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व लागू केले आहे. त्या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व **दि.१६.०६.२०१६**_रोजी वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे.

२) मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जातीच्या दाखल्याबरोबरच जात पडताळणी समितीने वैध ठरविलेले **जात वैधता प्रमाणपत्र** सादर करणे आवश्यक आहे. शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२/१२/२०११ नुसार जात वैधता प्रमाणपत्र मिळणेकरिता संबंधित जात वैधता समितीस आवश्यक ते दस्तऐवज सादर केल्याची पोहोच सादर केल्यानंतरच **<u>तात्पुरत्या</u>** स्वरुपाची नियुक्ती देण्यात येईल. **जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही सर्वस्वी निवड झालेल्या उमेदवारांची जबाबदारी राहील.**

३) **अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या उमेवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.**

४) मागासवर्गीय उमेदवाराची गुणवत्तेवर निवड झाल्यास त्याची निवड ही खुल्या प्रवर्गात झाल्याचे समजण्यात येईल.

५) मागासवर्गीय उमेदवारांनी ते महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असल्याचे प्रमाणपत्र (Domicile Certificate) स्वत:च्याच नावाने सादर करणे आवश्यक आहे.

**समांतर आरक्षणासंबंधीचे अटी / नियम:-**

१) माजी सैनिकांसाठी १५ टक्के आरक्षण राहील. माजी सैनिक असणाऱ्यांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालय यांच्याकडे नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदरचे आरक्षण हे केवळ माजी सैनिकांनाच लागू असून त्यांच्या वारसांना या आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही याची नोंद घ्यावी. माजी सैनिकांकडे सेवेतून कार्यमुक्त करण्यात आल्याचे कार्यमुक्त प्रमाणपत्र (Discharge Certificate) असणे आवश्यक आहे.

**महत्वाच्या सूचना :**

१) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वत:चा मोबाईल नंबर व ई-मेल आय-डी नोंदणी करतेवेळी काळजीपूर्वक भरावा.उमेदवारांनी त्यांचा ई-मेल आय-डी व मोबाईल नंबर भरती-प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वापरात ठेवणे, ही सर्वस्वी उमेदवाराची जबाबदारी आहे. उमेदवाराचा ईमेल-आयडी व मोबाईल नंबर बंद झाल्यास अथवा बदलला गेल्यास उमेदवारास मेल अथवा संदेश प्राप्त न झाल्यास महानिर्मिती कंपनी जबाबदार राहणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) या संदर्भातील अधिक माहिती महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

३) अ) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे व अर्जात भरलेल्या माहितीच्या अनुषंगाने ती सिध्द करण्याकरीता आवश्यक कागदपत्रे ही कागदपत्रे पडताळणीवेळी सादर करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास अर्ज संगणकाद्वारे स्विकारला जाणार नाही त्यामुळे उमेदवारांनी अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी. ऑनलाईन अर्ज काळजीपूर्वक भरावा. अचूक अर्ज भरण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

ब) उमेदवाराने अर्जात अचुक माहिती भरणे ही त्यांची वैयक्तिक जबाबदारी आहे. एकदा भरलेली माहिती उदा.जात, धर्म, माजी सैनिक, इत्यादी बाबतीत भविष्यात कोणताही बदलासंबंधित अर्ज स्विकारला जाणार नाही किंवा तसा कोणताही बदल केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

४) वाहन चालक या पदाकरीता उमेदवारांची लेखी परीक्षा मराठी भाषेमध्ये घेण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

५) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र या कार्यालयात नांव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी विहित नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

६) ऑनलाईन अर्ज स्विकृत करण्यापूर्वी उमेदवार त्यांनी भरलेल्या माहितीमध्ये बदल करु शकतात. परंतु एकदा अर्ज स्विकृत (Submit) करण्यात आल्यानंतर कोणत्याही प्रकारचा बदल उमेदवारास करता येणार नाही व शेवटी भरलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवाराने आवश्यक सर्व तपशील व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी. अर्जाची प्रत स्वत:जवळ तयार ठेवावी व अंतिम निवडीपूर्व अर्ज व कागदपत्रे तपासणीसाठी मागितली जातील त्यावेळी सदर कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

७) ऑनलाईन पध्दतीने वाहन चालक या पदाकरीता अर्ज सादर केल्यानंतर त्याची प्रत ही उमेदवारांनी वाहन चालक या पदाची पद भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्वत: जवळ बाळगणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. ऑनलाईन अर्जाची प्रत हरविल्यास, गहाळ झाल्यास त्यास महानिर्मिती कंपनी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

८) ऑनलाईन अर्ज भरत असताना काही अडचणी आल्यास आपली अडचण hrhelpdesk@mahagenco.in या ई-मेल आयडीवर नोंदवावी किंवा ०२२-४२०४०१८८ / ४२०४०२४० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

९) कागदपत्रे पडताळणी करीता निवड होणाऱ्या उमेदवारांनी अर्जासोबत दिलेल्या नमुन्याच्या स्वरुपातच ते वाहन चालक या पदाकरिता वैद्यकीय दृष्ट्या सक्षम असल्याचे नोंदणीकृत वैद्यकीय सल्लागाराने दिलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे अन्यथा अशा उमेदवारांचे अर्ज अपात्र ठरविण्यात येतील. पोष्टाच्या विलंबाकरिता महानिर्मिती कंपनी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

**<u>उमेदवारांना इतर महत्वाच्या सूचना :</u>**

१) शासकीय, निमशासकीय, शासकीय उपक्रम तसेच महानिर्मिती कंपनीच्या सेवेतील कर्मचाऱ्याने वर नमूद केलेल्या पदांकरिता अर्ज केला असेल, तर सदर कर्मचाऱ्याला सक्षम अधिकाऱ्याने वितरीत केलेले खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र अंतिम निवडपूर्व कागदपत्रे तपासणीवेळी सादर करणे आवश्यक राहील.

२) पदासाठी असणारी किमान शैक्षणिक अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या व लेखी परिक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल.

३) उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी / भरती प्रक्रिया शुल्क भरण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो की नाही याची खात्री करावी. **भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेली भरती प्रक्रिया शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही,** तसेच इतर कोणत्याही कारणास्तव भरती प्रक्रिया शुल्क परत केले जाणार नाही. उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर राजकीय तसेच अन्य कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे तसेच प्रमाणपत्रे / कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची / तिची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

४) **उमेदवारांना लेखी व वाहन चालन परिक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वःखर्चाने उपस्थित रहावे लागेल.**

५) परिक्षेच्या वेळी परिक्षा कक्षामध्ये किंवा परिक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

६) समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असून ते त्या त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातून भरण्यात येते. उपरोक्त समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्याच जाती प्रवर्गातील इतर उमेदवारांमधून भरण्यात येतील.

७) **उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान पूर्णपणे अवगत असणे आवश्यक आहे याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.**

८) **उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा. तसेच उमेदवाराजवळ महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याबाबतचे स्वतःच्या नावे असलेले अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व दि. १६.०६.२०१६ रोजी वैध असलेले उपलब्ध असणे आवश्यक आहे.**

९) वि.जा.(अ), भ.ज.(क), इतर मागासवर्ग या मागासप्रवर्गातील उमेदवारांना सामाजिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व **दि. १६.०६.२०१६ रोजी वैध असलेले** प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट) अंतिम निवडपूर्व कागदपत्रे तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

१०) **अनुसूचित जमाती प्रवर्ग वगळून** इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांना कामावर रुजू होण्यापूर्वीच सर्व कागदपत्रे प्रस्तावासह जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करुन ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही संबधित उमेदवाराची जबाबदारी राहील. अन्यथा सदर उमेदवारांची महानिर्मिती कंपनीतील सेवा समाप्त करण्यात येईल.

११) लेखी परिक्षेतील गुणानुक्रमे निवडीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांना कंपनीने मागणी केल्यानुसार कागदपत्रे तपासणीवेळी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, अनुभव, समांतर आरक्षणासंबंधीचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, विशेष प्राधान्य गटात मोडत असल्याचे प्रमाणपत्र, शासकीय सेवेतील उमेदवारासाठी नियुक्ती प्राधिकाऱ्याचे ना हरकत प्रमाणपत्र, लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र तसेच मागासवर्ग जाती प्रमाणपत्र इत्यादी जे जे उमेदवारास लागू होते त्या दाखल्यांच्या साक्षांकित प्रती व वाहन चालक या पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना अर्जात भरलेली माहिती सिध्द करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती (Attested copies) या स्व-साक्षांकित करुन अर्जासोबत कागदपत्रे तपासणीवेळी सादर करणे आवश्यक राहील.

१२) जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या बदलण्या सापेक्ष आहे. निवड झालेल्या उमेदवारांना उपलब्ध रिक्त जागा व आवश्यकतेनुसार महानिर्मिती कंपनीच्या विद्युत केंद्रात नेमणूका देण्यात येतील.

१३) सदर भरती प्रक्रिया पूर्णत: वा अंशत: रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार महानिर्मिती कंपनी राखून ठेवत आहे.

१४) वाहन चालक या पदाकरीता अर्ज सादर करताना आवश्यक शैक्षणिक अर्हता व उमेदवारांकरीता लागू असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे व वाहन चालक या पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना अर्जात भरलेली माहिती सिध्द करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे ही जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व **दि. १६.०६.२०१६** रोजी वैध असणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज स्विकृत (Submit) करण्यापूर्वी उमेदवार त्यांनी भरलेल्या माहितीमध्ये बदल करु शकतात. तद्नंतर एकदा अर्ज स्विकृत (Submit) करण्यात आल्यानंतर उमेदवाराची कोणतीही दुरुस्ती विचारात घेतली जाणार नाही. सदर बाबतीत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

**अर्ज करण्याची पध्दत :**

१) उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार असल्याने परिक्षेसाठी विहित केलेला नमुना अर्ज व माहिती http://www.mahagenco.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. वर दर्शविलेल्या लिंकवर ऑन लाईन अर्ज भरण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

२) उमेदवार परिक्षा शुल्क भरण्यासाठी Net Banking / क्रेडीट कार्ड / डेबिट कार्ड या सुविधा वापरुन परिक्षा शुल्क भरु शकतील. उमेदवारांनी खाली दर्शविल्याप्रमाणे परिक्षा शुल्क उपरोक्त पध्दतीद्वारे भरावयाचे आहे. **माजी सैनिक उमेदवारांकरीता सदर फी भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.**

| | | |
|---|---|---|
| खुल्या प्रवर्गातील उमेदवार | : | रु. ५००/- |
| मागासवर्गीय उमेदवार | : | रु. ३००/- |

३) विहित नमुन्यातील ऑन लाईन अर्ज कंपनीच्या संकेत स्थळावर **दिनांक ०१.०६.२०१६** पासून उपलब्ध राहील. सदर अर्ज स्विकारण्याची अंतिम **दि. १६.०६.२०१६** रोजी २३:५९ वाजेपर्यंतच राहील. उमेदवारांचे ऑनलाईन भरलेले अर्जच स्विकारले जातील. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

४) अर्जामध्ये नमूद केलेल्या बाबी / विवरणेच ग्राह्य धरण्यात येतील व ती सिध्द करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. अर्ज सादर केल्यानंतर दिलेली माहिती / विवरणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

५) ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जामधील सर्व माहितीची सत्यता तपासण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचा पुरावा जसे की शैक्षणिक अर्हता, वय तसेच जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर दाखला, वैद्यकीय प्रमाणपत्र, माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र, इत्यादी प्रमाणपत्रांच्या स्वत: साक्षांकित केलेल्या प्रती सिस्टीम जनरेटेड अर्जासोबत मागणी केल्यानंतर देणे क्रमप्राप्त आहे.

६) अर्जामध्ये केलेला दावा व सादर केलेल्या कागदपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती खोटी समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल.

७) शासकीय / निमशासकीय महामंडळ, इतर वीज कंपनीमधील कर्मचा-यांनी त्यांचे अर्जासोबत कार्यरत कार्यालयातून / नियुक्ती प्राधिकाऱ्याने स्वसांक्षाकीत केलेली ' ना हरकत प्रमाणपत्राची ' प्रत अर्जासोबत जोडावी.

**निवड पध्दती :**

१) जाहिरातील अनुसरुन पात्र झालेल्या अर्जदार उमेदवाराची चाळणी करण्यासाठी लेखी परिक्षा घेण्यात येईल.

२) लेखी परिक्षा ही वाहन विषयक नियम व वाहन दुरुस्ती या विषयांवर आधारित असेल.

३) **उमेदवारांना लेखी परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार** तसेच जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेल्या रिक्त जागांनुसार सामाजिक आणि समांतर आरक्षण विचारात घेऊन १:५ या प्रमाणात पात्र उमेदवारांना वाहन चालन परीक्षेकरीता कागदपत्र पडताळणी अंती बोलविण्यात येईल.

४) १:५ या प्रमाणात पात्र उमेदवारांची वाहन चालनाची परीक्षा घेण्यात येईल.

५) वाहन चालन परीक्षेनंतर उमेदवारास लेखी परीक्षेत तसेच वाहन चालन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांचे एकत्रिकरण करुन जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेल्या रिक्त जागांनुसार सामाजिक आणि समांतर आरक्षण विचारात घेऊन निवड सूची यादी तयार करण्यात येईल. सदरची निवडसूची कंपनीच्या www.mahagenco.in या संकेत स्थळावर उमेदवारांच्या माहितीकरिता उपलब्ध करुन देण्यात येईल.

६) उमेदवारांकडून मागणी केल्यानंतर सादर केलेल्या अर्जाची सविस्तर छानननी निवडसूची बनविते वेळी केली जाईल. ऑनलाईन अर्जामध्ये दर्शविलेल्या माहिती पृष्टयर्थ योग्य ते दस्तऐवज सादर करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

७) निवडसुची बनवितांना ज्या उमेदवारांचे एकूण गुण समान असतील तर सदर उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेऊन त्यांच्यातील ज्येष्ठताक्रम ठरविण्यात येईल.

८) **निवड झालेल्या उमेदवारांनी अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे,माजी सैनिक असल्याचे इत्यादी सिध्द करणे हे सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहिल. यापैकी कोणतीही बाब उमेदवार सिध्द करु न शकल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल. तसेच सदर बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही.**

९) दस्तऐवज सादर करण्याच्या कालावधीमध्ये उमेदवाराने दस्तऐवज सादर न केल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

१०) वाहनचालक यांची रिक्त पदे ही महानिर्मिती कंपनीच्या विविध विद्युत केंद्रातील अनुशेष लक्षात घेता भरण्यात येत असल्याने निवड होणाऱ्या उमेदवारांना महानिर्मिती कंपनीच्या कोणत्याही विद्युत केंद्रातील ठिकाणी काम करणे बंधनकारक राहील.

११) वाहनचालक या पदाच्या निवड पध्दतीत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार महानिर्मिती कंपनी राखून ठेवीत आहे.

**<u>महत्वाच्या तारखा :</u>**

| | |
|---|---|
| ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | दिनांक ०१.०६.२०१६ ते दिनांक १६.०६.२०१६ |
| Net Banking द्वारे फी भरण्याचा कालावधी | दिनांक ०१.०६.२०१६ ते दिनांक १६.०६.२०१६ |
| लेखी परिक्षेची तारीख | महानिर्मिती कंपनीच्या संकेत स्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल. |
| ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता अडचण येत असल्यास दूरध्वनी क्रमांक | ०२२-४२०४०१८८ / ४२०४०२४० |
| ई-मेल आयडी | hrhelpdesk@mahagenco.in |

**ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज सादर करण्याकरीता येथे क्लिक करावे**